(महाराष्ट्र शासन)

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,

## शेंडा पार्क, कोल्हापूर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

टेलिफोन नं-०२३१-२६४१५८३ फॅक्स नं.०२३१-२६४५२७९

ईमेल- storercsmgmck@gmail.com वेबसाईट - www.rcsmgmc.ac.in

जा.क्र.राछशामशावैमक/भांडार-अ/खाजगी वाहन करार/१४१४ /२०२३, दिनांक:-१३/०४/२०२३

**दरपत्रक/मागणीपत्र**

**प्रति,**

--------------------------

--------------------------

--------------------------

विषय: खाजगी वाहन भाडेतत्वावर घेणेकरीता दरपत्रकाचे मोहरबंद लिफाफे सादर करणेबाबत....

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. शापसे - ३४२०/प्र.क्र.५४/का. ३१, दिनांक १०/०८/२०२०.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेकरिता उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयात मुद्दा क्र.८ नुसार संचालनालयाच्या मान्यतेच्या अटीच्या अधीन राहुन अधिष्ठाता यांचेसाठी शासकीय वाहन उपलब्ध नसल्याने स्थानिक बाजारातुन खाजगी वाहन भाडेतत्वावर घेण्यासाठी तातडीने विहित पद्धतीने दरपत्रक प्रक्रिया करुन पुरवठादारांकडून दरपत्रकाचे मोहरबंद लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रधारक या कार्यालयास मागणी केल्याप्रमाणे दरपत्रकातील अटी व शर्तीच्या अधिन राहून भाडेतत्वावर खाजगी वाहन पुरविण्यास इच्छुक असल्यास आपले दरपत्रकाचा मोहरबंद लिफाफा विहीत मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत शेंडा पार्क, कोल्हापूर येथे सादर करावा.

| अ.क्र. | वाहनाचा तपशील | सर्व करांसहीत प्रती महिना वाहन भाडे रुपये |
|---|---|---|
| १ | इन्होवा क्रिस्टा (Crysta)<br>वातानुकुलित वाहन | |

**महत्वाच्या अटी व शर्ती:**

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक २४/०४ /२०२३ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ग्राह्य धरले जाणार नाहीत.

२. सुचना फलकावरील जाहिर नोटीस प्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यात सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. दरपत्रक मोहरबंद लिफाफा **"अधिष्ठाता, राजर्षी छ.शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर"** यांचे नावे विहित मुदतीत या कार्यालयास सादर करावा, त्याच

प्रमाणे **दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर भाडेतत्वावरील खाजगी वाहन दरपत्रक लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक व दरपत्रधारकाच्या नावाचा शिक्का** इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

३. प्राप्त झालेले दरपत्रक मोहरबंद लिफाफे दिनांक २५/०४/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.अधिष्ठाता यांच्या दालनात, मा.अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखालील समिती समोर उघडण्यात येईल. दरपत्रधारकास जर दरपत्रक मोहरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेस स्वखर्चाने उपस्थित राहावे.

४. दरपत्रक ग्राह्य/ वैध कालावधी हा कार्यादेश नोंदविलेल्या दिनांका पासुन ११ महिन्यांचा राहिल.

५. सदरचे वाहनाची प्रति दिन धावसंख्या अंदाजे ५० कि.मी. व मासिक अंदाजे २५०० कि.मी. असेल. तसेच रुग्णालयात आपत्कालिन परिस्थिती कधीही उद्भवू शकते त्यामुळे सदर वाहन २४ X ७ कार्यरत राहील.

६. प्रस्तावीत बाबीसाठी दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराने दरपत्रक व सेवेचा दर्जा/ गुणवत्ता उत्कृष्ट असेल, अशाच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

७. दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज (Document) - जीएसटी (GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे. त्यासोबत (१) आर.सी. बुकची छायांकित प्रत, (२) विमा प्रमाणपत्राची छायांकित प्रत, (३) जीएसटी प्राधिकृत प्रत (४) पॅन कार्डची छायांकित प्रत, (५) अनुभव प्रमाणपत्र, (६) पी.यु.सी. प्रमाणपत्राची छायांकित प्रत, (७) टुरिस्ट परवाना, (८) परिवहन नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत, (९) एकल दरपत्रधारक असल्याबाबतचे हमीपत्र, (१०) सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र.

८. वाहनाची सेवा संस्थेचे अधिष्ठाता यांना इतर माध्यमातुन वाहन उपलब्ध होईपर्यंत अथवा अकरा महिन्याचा कालावधी संपुष्टात आल्यावर अथवा कार्यालयाची मर्जी असे पर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहिल, तसेच सेवा समाधानकारक न दिल्यास देखील वाहनाचा करार रद्द करण्यात येईल.

९. वाहन दुरुस्तीस घेऊन जाताना ०३ दिवस अगोदर कार्यालयाची लेखी पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल व त्याऐवजी पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी वाहन पुरवठादार यांची राहील. वाहन किरकोळ किंवा मोठ्या तांत्रिक बिघाडामुळे नादुरुस्त झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून याच कंपनीचे वाहन तात्काळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील याची नोंद घेण्यात यावी.

१०. वाहन चालकाची नेमणुक/ वेतन/ पर्यायी व्यवस्था या बाबी संबंधित सेवा पुरवठादार यांचेकडे असतील.

११. वाहनावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा, न्यायालयीन प्रकरणे नसावेत.

१२. बाहेरगावी दौऱ्यानिमित्त जावे लागल्यास टोल नाका व पार्किंग चा खर्च कंपनीस करावा लागेल.

१३. वाहनाचे लॉग बुक वाहन चालकाने अद्ययावत ठेवावयाचे असुन, संबंधीत वाहन वापरणारे अधिकारी यांची स्वाक्षरी लॉग बुक वर घेण्यात यावी. अन्यथा फिरस्ती ग्राह्य धरली जाणार नाही.

१४. कार्यालयाचे संबधीत अधिकारी यांनी शासकीय कामकाजासाठी मुख्यालयाबाहेर प्रवास करावयाचे असल्यास तसे लेखी पत्र वाहनधारक/ वाहनचालक यांनी प्राप्त करून घेऊनच मुख्यालयाबाहेर प्रवास करावयाचा असुन कार्यालयाच्या लेखी परवानगी शिवाय सदरहू वाहन मुख्यालयाबाहेर प्रवासासाठी नेण्यात आल्यास त्यासंबंधीच्या देयकाची अदायगी हे कार्यालय करणार नाही.

१५. वाहनाचा अनुचित प्रकार घडल्यास त्याची नुकसानभरपाई हे कार्यालय करणार नाही. वाहनाचा अपघात झाल्यास किंवा जिवीतहानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१६. रविवार अथवा इतर सुट्टीच्या दिवशी सुध्दा आवश्यकतेनुसार वाहन वापरण्यात येईल.

१७. वाहनामध्ये इंधन पूर्ण क्षमतेने असणे आवश्यक आहे.

१८. सदर वाहन हे सुस्थितीत असावे व ५ वर्षापेक्षा जूने नसावे. तसेच, वाहनाचे ट्युब टायर्स हे नविन असावेत.

१९. वाहनधारक यांना विहित नमुन्यातील रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर दरपत्रकात नमुद अटी व शर्ती सर्व मान्य असल्याचे करार पत्र नोटरीसह कार्यालयाचे आदेश प्राप्त करण्यापूर्वी सादर करणे आवश्यक राहील.

२०. देयकाची अदायगी (PAYMENT) वाहनधारक यांनी प्रती माह प्रमाणे देयक लॉग बुकच्या छायांकित प्रतीसह कार्यालयात सादर करणे आवश्यक राहिल. तसेच वापरकर्ता अधिकारी यांनी देयक प्रमाणित करून दिल्यानंतरच विहित उद्दिष्टांतर्गत अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देयकाची अदायगी करण्यात येईल.

२१. इन्होवा क्रिस्टा (Crysta) वातानुकुलित वाहन (६+१) हे आधुनिक (Latest) मॉडेलचे असल्यास अशा वाहनास प्राधान्य देण्यात येईल.

२२. वाहनधारकास आगाऊ रक्कम (ADVANCE PAYMENT) अदा करण्यात येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीतमुळे देयक अदा करण्यास झालेल्या विलंबापोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त् शुल्क/ रक्कम हे कार्यालय अदा करणार नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही मागणी मान्य करता येणार नाही.

२३. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटी शर्तीत आवश्यकतेनुसार अंशतः बदल करणे/ रद्द करणे/ संपूर्ण प्रक्रिया रद्द करणे इत्यादी अधिकार निम्नस्वाक्षरीत (संस्थाप्रमुख / अधिष्ठाता) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

अधिष्ठाता,
राजर्षी छ.शाहू महाराज शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय,कोल्हापूर.

प्रतः मा.आयुक्त, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत: संस्थेचे सूचना फलक/ संकेतस्थळ (जाहिर नोटीस), राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर.